# राज्यघटना (भारताचे संविधान)

- हा भारताचा सर्वोच्च कायदा आहे.
- व्याख्या - संविधान म्हणजे देश अथवा राज्य चालवण्यासाठी आखून दिलेले मुळ आदर्श, पायंडे किंवा नियमांचा संच आहे
  - जर हे नियम कायदेशिर कलमांमध्ये लिहिले गेले असतील तर त्याला लिखित संविधान असे म्हणतात.

## राज्यघटनेची रचना :-

सध्या
- 1 - प्रस्ताविका
- 25 - भाग
- 12 - अनुसुची

26 - जाने - 1950 रोजी
- 1 - प्रस्ताविका
- 22 - भाग
- 8 - अनुसुची.

## शासनव्यवस्थेची अंगे

कोणत्याही शासनव्यवस्थेची प्रमुख 3 अंगे असतात.

1. कार्यकारी मंडळ - कायद्यांच्या अंमलबजावणीची जिम्मेदारी
2. कायदेकारी मंडळ - कायदे करणे
3. न्यायव्यवस्था - विविध प्रकारचे तंटे सोडवणे

भारतातील शासनव्यवस्था 2 स्तरावर कार्य करते

1. संघ शासन व्यवस्था.
2. राज्य शासन व्यवस्था.

📰डेली स्पर्धा परीक्षा अपडेट मिळविण्यासाठी जॉईन वर्तमान निर्णय व्हाट्स अप ग्रुप
👆 येथे क्लिक करा

# संघ शासन व्यवस्था

### कार्यकारी मंडळ
1. राष्ट्रपती
2. उपराष्ट्रपती
3. पंतप्रधान
4. मंत्रीमंडळ
5. महान्यायवादी

### कायदेमंडळ (संसद)
1. राष्ट्रपती
2. राज्यसभा
3. लोकसभा

### न्यायव्यवस्था
1. सर्वोच्च न्यायालय
2. उच्च न्यायालये
3. कनिष्ठ न्यायव्यवस्था

# राज्य शासनव्यवस्था

### कार्यकारी मंडळ
1. राज्यपाल
2. मुख्यमंत्री
3. मंत्रिमंडळ
4. महाधिवक्ता

### कायदेमंडळ (विधानमंडळ)
1. राज्यपाल
2. विधानसभा
3. विधान परिषद

### न्यायव्यवस्था
1. उच्च न्यायालय
2. कनिष्ठ न्यायव्यवस्था

Scanned with CamScanner

# घटना निर्मिती

## स्वतंत्र्यपुर्व काळातील संविधान सभेच्या मागण्या

- 1922 – महात्मा गांधी यांनी सर्वप्रथम 'संविधान सभा' असा शब्दोल्लेख न करता मागणी
- 1934 – मनवेंद्रनाथ रॉय - सर्वप्रथम संविधान सभेची कल्पना मांडली.
- 1935 – भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ने पहिल्यांदा संविधान सभेची औपचारीक मागणी केली.
- 1940 – ऑगस्ट ऑफर - लॉर्ड लिनलिथगो सरकारने पहिल्यांदाच भारताची घटना मुख्यत: भारतीयांनी तयार करावी हे तत्त्व मान्य केले.
- 1942 – क्रिप्स मिशन – स्टॅफर्ड क्रिप्स यामध्ये भारताची घटना पुर्णत: भारतीयांनी तयार करावी हे तत्त्व मान्य करण्यात आले.
- 1946 – कॅबिनेट मिशन प्लॅन यामध्ये संविधान सभेच्या निर्मितीची तरतुद करण्यात आली.

Scanned with CamScanner

## संविधान सभेची निर्मिती व रचना

- कॅबिनेट मिशन प्लॅनमधील तरतुदीनुसार संविधान सभेची रचना – एकुण सदस्य - 389
- कॅबिनेट मिशन ला त्रिमंत्री योजना सुद्धा म्हणतात
  (1) पॅथिक लॉरेन्स (अध्यक्ष) (2) स्टॅफर्ड क्रिप्स (3) A.B. अलेक्झांडर
  (स्टॅफर्ड क्रिप्स व A.B. अलेक्झांडर – सदस्य)

- संविधान सभेसाठी पहिल्यांदा निवडणुका - 1 जुलै-1946

एकुण सदस्य 389

- 292 - ब्रिटिश प्रांत (11)
- 4 - चिफ कमिशनर चे प्रांत
- 93 - भारतीय संस्थानिकांचे प्रतिनिधी

## या निवडणुकीचे काही वैशिष्ट्ये

(1) साधारणतः 10 लाख लोकसंख्येमागे 1 सदस्य असे प्रमाण ठरवण्यात आले

(2) निवडणुका केवळ 296 जागांसाठी घेण्यात आल्या तर 93 हे संस्थानिक नियुक्त जागा होत्या

(3) 296 जागांपैकी → 208 जागा - कॉंग्रेस
73 जागा - मुस्लीम लीग
15 जागा - अपक्ष

(4). 296 जागांपैकी → 15 जागांवर महिला विजयी
26 जागा → अनुसूचीत जाती (SC)
33 जागा → अनुसूचित जमाती (ST)

Scanned with CamScanner

## संविधान सभेचे कामकाज -

- 22 ऑगस्ट 1946 — अंतरिम सरकार स्थापन
- 02 सप्टेंबर 1946 - अंतरिम सरकारचे मंत्रीमंडळ तयार
- संविधान सभेच्या एकुण 3 बैठका झाल्या
- पहिली बैठक - 9 डिसें 1946
  संविधान सभा - तात्पुरते अध्यक्ष - डॉ. सच्चिदानंद सिन्हा
  - 11 डिसें. 1946 - कायमस्वरूपी अध्यक्ष - डॉ. राजेंद्र प्रसाद
    उपाध्यक्ष - ~~सर बी.~~ एच. सी. मुखर्जी
    घटनात्मक सल्लागार - सर बी. एन. राव
  - 13 डिसें - 1946 - जवाहरलाल नेहरूंनी संविधान सभेत 'उद्देशपत्रिका' मांडली.
  - 22 जाने 1947 रोजी संविधान सभेने तिचा स्वीकार केला
  - भारतीय राज्यघटनेची प्रस्तावना (सरनामा) उद्देशपत्रिका वरूनच तयार करण्यात आला आहे.

## संविधान सभेच्या रचनेत बदल -

- 3 जून 1947 - माउंट बॅटन योजना जाहिर
  या योजनेच्या आधारावर → ब्रिटिश पार्लमेंट
- 18 जुलै 1947 - भारतीय स्वातंत्र्याचा कायदा संमत
- या कायद्याने भारत व पाकिस्तान ही 2 राष्ट्रे निर्माण करण्यात आले
- भारतीय स्वातंत्र्य कायदा, 1947 अन्वये संविधान सभेच्या बाबतीत पुढील 3 बदल करण्यात आले.

Scanned with CamScanner

① संविधान सभेला पुर्ण सार्वभौम बनविधान आले.

- ब्रिटिश पार्लमेंटने केलेल्या कोणत्याही भारतविषयक कायद्यात बदल करण्याच्या किंवा तो रद्द करण्याचा अधिकार प्राप्त झाला

② संविधान सभेला कायदेमंडळाचा दर्जा प्राप्त झाला

2 कार्ये - ① स्वातंत्र भारतासाठी घटना निर्मिती
② देशासाठी कायदे करणे

- संविधान सभेच्या बैठकीवेळी → अध्यक्ष - डॉ. राजेंद्र प्रसाद
- कायदेमंडळ म्हणून कार्य करतांना → अध्यक्ष → जी. व्ही मावळणकर

(17 नोव्हें - 1947 - अध्यक्ष म्हणून निवड)

- संविधान सभेची ही दोन्ही कामे - 26 नोव्हें - 1949 पर्यंत चालली.
- 26-जाने 1950 ते मार्च 1952 पर्यंत संविधान सभेने तात्पुरती संसद म्हणून कार्य केले.
- 1952 - पहिल्या सार्वत्रिक निवडणूका झाल्या

③ पाकिस्तान निर्मितीमुळे मुस्लीम लिग संविधान सभेतून बाहेर पडल्यामुळे संविधान सभेतील सदस्य संख्या - 299 इतकी झाली.

- सर्वाधिक प्रतिनिधी - संयुक्त प्रांत - 55
- संस्थानिकांपैकी सर्वाधिक प्रतिनिधी - म्हैसुर - 7

Scanned with CamScanner

## संविधान सभेचे उपाध्यक्ष

- 16 जुलै 1947 रोजी 2 उपाध्यक्षांची निवड करण्यात आली.

(1) एच. सी. मुखर्जी
(2) व्ही. टी. कृष्णमाचारी

## संविधान सभेच्या समित्या -

### (1) मसुदा समिती (Drafting Committee)

स्थापना - 29 ऑगस्ट 1947

अध्यक्ष - डॉ. बाबासाहेब आंबेडकर (भारतीय संविधानाचे जनक)

सदस्य - एकुण 7 → (1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
(2) एन. गोपालस्वामी
(3) अल्लादी कृष्णास्वामी अय्यर
(4) सईद मोहम्मद सादुल्लाह
(5) डॉ. के. एम मुन्शी
बी. एल मित्तल → राजीनामा → (6) एन माधव राव
डी. पी. खेतान यांच्या → मृत्यूनंतर ⇒ (7) टी टी कृष्णमाचारी

- संविधान तयार होण्यासाठी → 2 वर्षे 11 महिने 18 दिवस लागले

पहिला टप्पा - 6 Dec 1946 — 14 Aug 1947
दुसरा टप्पा - 15 Aug 1947 — 26 Nov. 1949
तिसरा टप्पा - 27 Nov. 1949 — March 1952

Scanned with CamScanner

- या कालखंडात संविधान सभेची 11 सत्रे झाली. यापैकी 4 सत्रे स्वातंत्र्यापूर्वी तर 7 सत्रे स्वातंत्र्यानंतर झाली
- संविधान सभेचे कामकाज - 166 दिवस चालले
- यापैकी मसुद्यावर चर्चा - 144 दिवस चालली
- आपली राज्यघटना तयार करताना घटनाकर्त्यांनी जगातील सुमारे 60 घटनांचा विचार केला
- घटनेचे हस्तलिखित - 3 प्रती (2 इंग्रजी व 1 हिंदी)
  → इंग्रजी व हिंदी भाषेत लिहिल्या होत्या
  - हस्ताक्षर - प्रेम बिहारी नारायण रायझादा
- शेवटची सभा - 24 जाने 1950 रोजी झाली. या दिवशी संविधान सभेच्या 284 सदस्यांनी घटनेच्या तिन्ही प्रतिंवर सह्या केल्या.

## घटनेची स्वीकृती -

- 4 नोव्हें - 1948 → आंबेडकरांनी घटनेचा अंतिम मसुदा संविधान सभेत मांडला
- 26 नोव्हे - 1949 → घटना स्वीकृत करण्यात आली
  - घटनेच्या प्रास्ताविकेत याच तारखेचा उल्लेख आहे.
  - मुळ घटनेत - 22 भाग
    395 कलमे
    01 प्रस्ताविका
    08 अनुसुची

Scanned with CamScanner

# संविधान सभेच्या समित्या

1. संघराज्य घटना समिती – पं. जवाहरलाल नेहरू
2. संघराज्य अधिकार समिती – पं. जवाहरलाल नेहरू
3. प्रांतिय राज्यघटना समिती – सरदार वल्लभभाई पटेल
4. सुकाणू समिती – डॉ. राजेंद्र प्रसाद
5. कार्यपद्धती नियमन समिती – – " –
6. योग्यता समिती – अल्लादी कृष्णास्वामी अय्यर
7. हाऊस समिती – पट्टाभी सीतारमैया
8. मुलभूत हक्क, अल्पसंख्यांक, आदिवासी आणि वगळलेली क्षेत्रे यांवरील सल्लागार समिती – वल्लभभाई पटेल
9. मुलभूत हक्क उपसमिती – जे. बि. कृपलानी
10. अल्पसंख्यांक उपसमिती – एच. सी. मुखर्जी
11. ध्वज समिती – डॉ. राजेंद्रप्रसाद

---

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सदस्य असलेल्या समित्या

1. सल्लागार समिती
2. मुलभूत हक्क उपसमिती
3. अल्पसंख्यांक उपसमिती
4. संघराज्य घटना समिती

Scanned with CamScanner

## अंतरीम सरकारमधील मंत्रिमंडळ (1947)

1. पं. जवाहरलाल नेहरू - सरकार प्रमुख, विदेश मंत्री
2. सरदार वल्लभभाई पटेल - गृहमंत्री, माहिती व प्रसारण मंत्री
3. डॉ. राजेंद्रप्रसाद - शेती व अन्न
4. शफात अहमद खान - कला, शिक्षण व आरोग्य
5. सी. एच. भाभा - वाणिज्य
6. बलदेव सिंग - संरक्षण
7. आर. के. शन्मुख चेट्टी - वित्त मंत्री
8. सी. राजगोपालाचारी - उद्योग व पुरवठा मंत्री
9. जगजीवन राम - श्रम
10. सय्यद अली जाहिर - कायदा मंत्री

Scanned with CamScanner

# प्रस्ताविका

- प्रस्ताविका म्हणजे प्रस्तावना होय.
- नाना पालखीवाला यांनी प्रस्ताविकेला घटनेचे ओळखपत्र असे संबोधले
- राज्यघटनेची प्रस्ताविका → पंडित नेहरूंनी संविधान सभेत मांडलेल्या 'उद्देशपत्र' यावर आधारीत आहे.
- प्रस्ताविकेत आतापर्यंत एकदाच सुधारणा (घटनादुरुस्ती) करण्यात आली
  - 42 वी घ.दु - 1976 → याद्वारे सरनामामध्ये समाजवादी, धर्मनिरपेक्ष व एकात्मता हे शब्द टाकण्यात आले.
- केशवानंद भारती खटल्यात प्रस्ताविका घटनेचाच भाग असल्याने तिच्यामध्ये सुधारणा करता येवू शकते.
- मात्र त्याद्वारे घटनेच्या मुलभूत संरचनेत बदल करता येत नाही.

## राज्यघटनेतील महत्वाचे भाग व कलमे

- भाग - I संघराज्य व त्यांचे राज्यक्षेत्र
  (कलम 1 ते 4)

Scanned with CamScanner